स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत 'समाजशास्त्र'
विषयातील पीएच्.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करावयाचा
संशोधनपूर्व आराखडा

"ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणात शिक्षणाची भूमिका एक समाजशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा (इ.स.2010-2020)"

संशोधिका

मुळे स्वरुपा मल्लिकार्जून

एम.ए., एम.एड्.

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.मनोहर तोटरे

शाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालय, मुखेड, जि. नांदेड

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्रे संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ऑगस्ट 2023

“ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणात शिक्षणाची भूमिका एक समाजशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा (इ.स.2010-2020)”

प्रस्तावना :

मानव संसाधन विकासात शिक्षण हा मूलभूत घटक आहे. मानव व समाज विकासाचे प्रभावी साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. 18 व्या शतकात इंग्रज शासनाने भारतात अनेक शिक्षण संस्थांची स्थापना केली. म्हणजेच शिक्षणाचा प्रसार भारतात इंग्रजांनी केला आहे. कालांतराने भारतात अनेक समाजसुधारकांचा उदय झाला. विशेषत: महाराष्ट्रात महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख आदी समाजसुधारकांनी बहुजन समाजातील मुलां-मुलींना शिक्षण घेता यावे या दृष्टिकोनातून अनेक शैक्षणिक संस्थांची स्थापना केली. सर्वप्रथम महात्मा फुलेंनी अस्पृश्य समाजातील मुलींकरीता पहिली शाळा काढली. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थांनात बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी शाळा व बोर्डिंगची स्थापना केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण केले. कर्मवीर भाऊराव पाटीलांनी रयत एज्युकेशन सोसयटीची स्थापना करून अनेक संस्थांची स्थापना केली. याचाच अर्थ असा की, शिक्षणापासून वंचित असणाऱ्या बहुजन समाजाला शिक्षण खुले करून

शिक्षणाच्या प्रक्रियेत समाविष्ट करून घेतले. परिणामी, बहुजन समाजातील बहुसंख्य विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राज्यघटनेची निर्मिती केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व दिले व शिक्षण हा विषय 'समवर्ती सुचित' समाविष्ट केला. भारतीय संविधानातील चौथे प्रकरण मार्गदर्शक तत्त्वाचे आहे. मार्गदर्शक तत्त्वांच्याकलम 51 (ए) नुसार चौदा वर्ष वयाच्या आतील मुलांमुलींना शिक्षण सक्तीचे आणि मोफत देण्याची तरतूद केली आहे. 2009 मध्ये महाराष्ट्र शासनाने बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम पारीत केला. संविधान विधेयक 2009 मध्ये कलम 21(अ) राज्याने तयार केलेल्या कायद्यानुसार वय वर्षे 6 ते 14 वयोगटातील मुलां-मुलींना राज्याकडून मोफत आणि सक्तीचे शिक्षण दिले जाईल असे अधोरेखित केले आहे. परिणामी, 1 एप्रिल 2010 पासून 6 ते 14 वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा अंमलात आल्यामुळे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढले आहे.

शिक्षण म्हणजे समाज प्रगती, शिक्षण म्हणजे सर्वांगीण विकास, शिक्षण म्हणजे अन्याय-अत्याचाराला वाचा फोडणारे प्रभावी हत्यार होय. शिक्षणासंबंधी अनेक व्यक्तींनी मत स्पष्ट केले आहे. ते याप्रमाणे, महात्मा गांधीच्या मते "केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे. शिक्षणाचा प्रारंभ देखील नव्हे. आत्मा आणि मन यांचा परिपूर्ण विकास करून व्यक्तीमधील सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती हेच खरे

शिक्षणाचे ध्येय होय." स्वामी विवेकानंद यांच्या मते, "शिक्षण हे सुप्त परिपूर्णतेचे प्रकटीकरण आहे. जे मनुष्यामध्ये आधीपासूनच अस्तित्त्वात आहे." रविंद्रनाथ टागोर यांच्या मते, "शिक्षण म्हणजे आत्माविष्कार होय. शिक्षण म्हणजे सत्य ज्ञानाचा साक्षात्कार होय." सदरील विचारवंतांनी शिक्षणाच्या केलेल्या व्याख्या महत्त्वपूर्ण आहेत. शिक्षणाचे दोन प्रकार सांगता येतील. औपचारिक व अनौपचारिक शिक्षण होय. शिक्षणाचे विविध कार्य देखील महत्त्वपूर्ण आहेत. सामाजिकरण, व्यक्तिमत्त्वाचा विकास, सामाजिक नियंत्रण, सामाजिक एकात्मता, स्थितीचे निर्धारण, सामाजिक गतिशिलतेसाठी मार्ग प्रदान करणे आणि सामाजिक विकास इत्यादी.

शिक्षण व्यवस्थेचा विचार करता, भारतीय समाज व्यवस्थेतील शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल होत आहेत. संगणक आणि माहिती तंत्रज्ञानाचा अवलंब शिक्षण क्षेत्रात केल्या जात आहे. त्यामुळे शिक्षणाच्या प्रक्रियेला गती प्राप्त झाली आहे. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खासगीकरण या प्रक्रियांनी उच्च शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये अनेक बदल केले आहेत. तसेच विविध प्रश्न निर्माण केले आहेत. किंबहुना या प्रक्रियांचे उच्च शिक्षण क्षेत्रावर जे परिणाम होत आहेत त्यापैकी महत्त्वाचा परिणाम म्हणजे शिक्षण क्षेत्रात महिलांचे प्रमाण वाढत आहे. आज प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग दिसत आहे. दहावी, बारावी, विद्यापीठीय परीक्षा, स्पर्धा

परीक्षा, युपीएससी, एमपीएससी यांमध्ये देखील ग्रामीण भागातील मुलींनी प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.

संदर्भ साहित्याचा आढावा व संशोधन पद्धती :

रामचंद्रन विमला (जानेवारी 2016) यांनी **"भारतीय महिला व मुलींच्या शिक्षणासमोरील प्रश्न"** हा संशोधनात्मक लेख योजना विशेषांक मध्ये प्रकाशित केला आहे. सदरील संशोधनात त्यांनी लिंगभाव असमानता वाढीस लागत आहे यामुळे मुलींना शिक्षण मिळविण्यात विविध अडचणी येत आहेत. अडचणींवर मात करून देखील बहुसंख्य मुली शिक्षण घेत आहेत. हा महत्त्वाचा निष्कर्ष काढला आहे. **हारदारे अण्णासाहेब (2016)** यांनी **"भारत निर्माणच्या दृष्टिने प्रभावी मार्ग शिक्षण"** हा संशोधनात्मक लेख योजना मासिकात प्रकाशित केला. सदरील संशोधनात जागतिकीकरणामुळे शिक्षण प्रक्रिया ग्रामीण भागात पोहोचली आहे. शिक्षणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल केल्यामुळे बदलासंदर्भातील विविध तरतुदीमुळे शिक्षणात मुलींचे प्रमाण वाढत आहे. शिक्षण क्षेत्राचा एकूणच परिणाम पाहता महिला सक्षमीकरणास शिक्षण सहाय्यभूत ठरत आहे असा निष्कर्ष काढला आहे. **पवार दिपक (मार्च 2016)** यांनी **"उच्च शिक्षणाचे वर्तमान स्वरूप"** या नावाचा संशोधनात्मक लेख समाजशास्त्र संशोधन पत्रिकेमध्ये प्रकाशित केला आहे. त्यांनी प्रस्तुत संशोधन लेखात शिक्षणाचे खासगीकरण झाल्यामुळे ग्रामीण भागात व्यावसायिक, शैक्षणिक संस्थांची संख्या वाढली आहे. किंबहुना ग्रामीण भागातील

मुली व्यावसायिक शिक्षण घेत आहेत. म्हणजेच महिलांचे शिक्षणातील प्रमाण व शैक्षणिक दर्जा उंचावत चालला असल्याचे अधोरेखित केले आहे.

संशोधन विषयाची निवड :

समकालीन समाजातील शिक्षणाचा विचार करता, ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष करता येत नाही. शहरामप्रमाणेच ग्रामीण भागामध्ये देखील विविध शैक्षणिक संस्थांची स्थापना करून शिक्षणाच्या सोई-सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. कारण ग्रामीण भाग हा अनेक वस्ती, वाडी, तांडे आणि गावामध्ये विस्तारीत झालेला आहे. या बाबीचा विचार करून ग्रामीण भागात देखील शिक्षण प्रत्येक व्यक्तीला घेता यावे या दृष्टिकोनातून व्यवस्था केलेली आहे. पूर्वी ग्रामीण भागातील महिला “चूल आणि मुल” या बाबींना प्राधान्य देऊन फक्त शेती क्षेत्रात काम करीत होत्या. कालांतराने ग्रामीण भागात माहिती तंत्रज्ञानाच्या साधनामुळे महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत. या बदलाचा परिणाम ग्रामीण समाजातील महिलांच्या जीवनमानावर देखील झाला आहे. किंबहुना ग्रामीण भागातील महिला देखील शिक्षण घेत आहेत. या बाबीचा विचार करून या घटकावर समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून संशोधन करण्याचे निश्चित केले आहे.

वर्तमान ग्रामीण समाजव्यवस्थेत क्रांतिकारी परिवर्तन व बदल होत आहेत. परंतु विविध सामाजिक समस्या वाढत आहेत. गरीबी, दारिद्र्य, बेरोजगारी, निरक्षरता, शिक्षणातील गळतीचे प्रमाण आणिगुणवत्तेचा प्रश्न, शिक्षणातील

उदासिनता, व्यावसायिक शिक्षणाचे वाढते प्रमाण, शिक्षणाचे खासगीकरण इत्यादी चिंतनपर प्रश्नांचा विचार करून अध्ययनासाठी ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणात शिक्षणाची भूमिका या विषयाची निवड केली आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :

सदरील संशोधन ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणात शिक्षणाची भूमिका या संदर्भातील आहे. ग्रामीण महिलांचे शिक्षणातील प्रमाण शैक्षणिक गुणवत्ताया बाबीचे मूल्यमापन करण्यासाठी हा विषय महत्त्वाचा आहे. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने सैद्धांतिक आणि व्यावहारिक दृष्टिकोनातून संशोधनाचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

1. ग्रामीण भागातविविध शैक्षणिक संस्थांची स्थापना होत आहे, या दृष्टिकोनातून सदरील संशोधनाचे महत्त्व अधोरेखित करता येईल.

2. ग्रामीण भागात शिक्षणाची व्यवस्था केल्यामुळे ग्रामीण समाजात परिवर्तन होत आहे, या दृष्टिकोनातून महत्त्व सांगता येईल.

3. ग्रामीण भागातील महिला शिक्षण घेऊन विविध शासकीय पदांवर कार्यरत आहेत, या दृष्टिकोनातून महत्त्व अधिक आहे.

4. ग्रामीण भागातील शिक्षित महिलांचा दृष्टिकोन वैज्ञानिक होत आहे, या अनुषंगाने महत्त्व विषद करता येईल.

5. ग्रामीण भागातील महिलांचे शिक्षणातील प्रमाण वाढत आहे शिक्षणामुळे महिलांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत आहे. किंबहुना महिला सक्षमीकरणाला चालना मिळत आहे, या दृष्टिकोनातून सदरील संशोधनाचे महत्त्व नमूद करता येईल.

संशोधन पद्धती :

"ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणात शिक्षणाची भूमिका" प्रस्तुत अध्ययन विषय हा संख्यात्मक व गुणात्मक दृष्टिकोनातून अभ्यास करण्याचे निश्चित केले आहे. हे लक्षात घेऊन वर्णनात्मक व सर्वेक्षणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

ग्रामीण भागातील महिलांची शैक्षणिक स्थिती, शिक्षण व्यवस्थेतील परिवर्तन, शैक्षणिक विकास, शैक्षणिक गुणवत्ता, शैक्षणिक गळती, यांसारख्या प्रमुख घटकांचा अभ्यास करण्यासाठी हा विषय निश्चित केला. सदरील संशोधन करीत असताना काही विशिष्ट उद्देश समोर ठेवून संशोधन करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1. ग्रामीण भागातील शैक्षणिक व्यवस्था आणि शैक्षणिक दर्जाचा अभ्यास करणे.
2. ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणात शिक्षणाची भूमिका अभ्यासणे.

3. ग्रामीण भागातील शैक्षणिक संस्थांचा, सोईसुविधांचा अभ्यास करणे.

4. ग्रामीण भागातील शिक्षित महिलांचा दर्जा व भूमिकांचा अभ्यास करणे.

5. ग्रामीण समाजातील महिलांचे उच्च शिक्षणातील प्रमाण व गुणवत्ता यांचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितकृत्ये :

समाजशास्त्रीय संशोधनातील गृहितकृत्ये ही एक प्रमुख पायरी आहे. त्यामुळे संशोधनात गृहितकृत्याचा अवलंब करावा लागतो. गृहितकृत्याची व्याख्या 'कोहेन व नॅगेल' या समाजशास्त्रज्ञाने केलेली आहे. त्यांच्या मते, "चौकशी वा संशोधनास चालना देणाऱ्या प्रारंभीक अडचणीचे व समस्येचे संभाव्य निराकरण व उत्तर सुचविल्याशिवाय आपण संशोधन कार्यात पहिले पाऊल सुद्धा पुढे उचलू शकत नाही. समस्येची अशी संभाव्य उत्तरे आपणास अध्ययन विषयाच्या कोणत्या तरी पैलूमुळे विषयाबाबतच्या पूर्व ज्ञानामुळे सूचतात. अशा उत्तराचे जेंव्हा विधानामध्ये रूपांतर केले जाते. तेंव्हा ते उत्तरे गृहितकृत्ये बनतात." प्रस्तुत अध्ययन विषयाची गृहितकृत्ये विधानाच्या स्वरुपात पुढीलप्रमाणे मांडणी केली आहे.

1. उच्च शिक्षणात व गुणवत्तेत ग्रामीण भागातील महिलांचे प्रमाण वाढत आहे.

2. ग्रामीण भागात शैक्षणिक व्यवस्था व शिक्षणाच्या दर्जामध्ये सुधारणा होत आहे.

3. ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणात शिक्षणाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

4. ग्रामीण भागातील शैक्षणिक संस्था,सोईसुविधांचा पुरवठा करीत आहेत.

5. ग्रामीण भागातील शिक्षित महिलांच्या दर्जात व भूमिकेमध्ये वाढ होत आहे.

संशोधन आराखडा :

प्रस्तुत संशोधनात संशोधन आराखड्याचा अवलंब करून संशोधन करण्यात येणार आहे. संशोधन आराखडा हा संशोधनातील मुख्य अवस्था आहे. संशोधन योजनाबद्ध पद्धतीने करण्यासाठी आराखड्याचा अवलंब करावा लागतो. संशोधनास सुरूवात करण्यापूर्वीच आराखडा निश्चित करावा लागतो. संशोधन आराखड्यात संशोधनाचा विषय, संशोधनाचे उद्देश, संशोधनाचे क्षेत्र, संशोधनाचा कालावधी, संशोधन पद्धती इत्यादी बाबींची नोंद करणे महत्त्वाचे असते.

सामाजिक संशोधनामध्ये संशोधनाचे प्रमुख चार प्रकार आहेत. त्यामध्ये वर्णनात्मक संशोधन आराखडा हा प्रकार महत्त्वपूर्ण आहे. प्रस्तुत संशोधनाच्या उद्देशांची पूर्तता करण्यासाठी ‘वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा’ अवलंब करण्यात येणार आहे. ‘वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा’ मुख्य उद्देश संकलित तथ्यांच्या आधारे विषयाचे वर्णन, विश्लेषण तथा स्पष्टीकरण करणे आहे. वर्णनात्मक संशोधन

आराखड्यात समुह, व्यक्ती किंवा घटना यासंबंधी वास्तविक तथ्यांचे, वैशिष्ट्यांचे वर्णनात्मक विश्लेषण करण्यात येते.

नांदेड जिल्ह्याची वैशिष्ट्ये आणि महिला सक्षमीकरण :

संशोधनाचा विषय निश्चित केल्यानंतर संशोधनाचे क्षेत्र कोणते असणार हेही ठरवावे लागते. त्याकरिता अध्ययन क्षेत्राची निवड करावी लागते. ही बाब लक्षात घेऊन प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र नांदेड जिल्हा निश्चित केला आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये एकूण सोळा तालुक्यांचा समावेश आहे.

संशोधनाचा कालावधी आणि मर्यादा :

अध्ययन क्षेत्राची निवड केल्यानंतर संशोधनाचा कालावधी व मर्यादा निश्चित करावीलागते. प्रस्तुत संशोधनाचा कालावधी सन 2010 ते 2020 अशा एकूण दहा वर्षांच्या कालखंडातील ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणात शिक्षणाची भूमिका काय आहे हा अभ्यास करण्यासाठी सदरील कालावधी निश्चित केला आहे. अध्ययनाच्या मर्यादा म्हणून असे सांगता येईल की, सदरील संशोधन 2010 ते 2020 या कालखंडातील आहे. ही प्रमुख मर्यादा आहे. दुसरी मर्यादा अशी सांगता येईल की, नांदेड जिल्ह्यातील सोळा तालुक्यातील फक्त ग्रामीण भागातील महिलांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

नमुना निवड पद्धती :

ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणात शिक्षणाची भूमिका अभ्यासण्याकरीता नमुन्याची निवड करणे महत्त्वपूर्ण आहे. नमुना निवडीच्या मुख्य दोन पद्धती आहेत. 'जनगणना' व 'नमुना पद्धत' प्रस्तुत अध्ययनासाठी नमुना पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. विषयाच्या संपूर्ण एककांऐवजी त्यांच्यातील प्रतिनिधी निवडून त्यांच्याशी संपर्क साधून तथ्य संकलित करण्यासाठी नमुना निवड पद्धती उपयुक्त आहे. सदरील पद्धतीत संपूर्ण समग्राचा अभ्यास केला जात नाही तर समग्रातून निवडलेल्या काही एककांच्या सखोल अभ्यासातून निष्कर्ष काढून ते निष्कर्ष संपूर्ण समाजाला लागू करता येतात. 'फ्रांक याटन' यांच्या मते, "नमुना शब्दाचा उपयोग केवळ कोणत्याही समग्राच्या एककॉस किंवा भागाकरीता केला पाहिजे. ज्या भागास या विश्वासाने निवडले असते की, तो समग्राचे प्रतिनिधीत्व करील."

संभाव्यता आणि गैर संभाव्यता नमुना निवड हे दोन प्रकार नमुना निवडीचे आहेत. गैर संभाव्यता नमुना निवडीतील 'सहेतूक किंवा उद्देशपूर्ण नमुना' निवड प्रकाराचा उपयोग करण्यात येणार आहे. संशोधक आपल्या अध्ययनाच्या उद्देशांना समोर ठेऊन एककांची निवड करतो. तेंव्हा त्यास उद्देशपूर्ण नमुना निवड असे म्हणतात. या प्रकारात संशोधक अध्ययन विषयाची सर्व वैशिष्ट्ये माहित करून घेतो आणि एककांची निवड करतो. त्यासाठी प्रश्नावली या तंत्राचा वापर करणार आहे. सदर प्रकारचा अवलंब करून 320 उत्तरदात्यांची निवड करण्यात येणार आहे.

प्रत्येक तालुक्यातून 20 उत्तरदाते निवडले जातील. म्हणजेच एकूण 16 तालुके आहेत. 16 x 20 = 320 उत्तरदाते निवडून अध्ययन करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन पद्धती :

संशोधनात तथ्य संकलनास विशेष महत्त्व आहे. अध्ययन विषयाच्या संबंधित तथ्यांचे संकलन करणे गरजेचे असते. तथ्य ही एक अशी घटना आहे की, जी वास्तविक रुपात घडलेली आहे. किंवा जी वास्तविक रूपात विद्यमान आहे म्हणूनच संपूर्ण संशोधनच तथ्य संकलनावर अवलंबून असते. जॉन गॉल्टुंग यांनी तथ्य या संदर्भात तुलनात्मकता, वर्गीकरण, विश्वसनीयता आणि प्रामाणिकता यासारख्या काही तत्त्वांचा समावेश करून तथ्यांचे महत्त्व स्पष्ट केले आहे. यासंदर्भात 'फेअर चाईल्ड' यांनी केलेली व्याख्या महत्त्वाची आहे. त्यांच्या मते, "निरीक्षण आणि मापनाच्या संदर्भात सर्वांचे एकमत किंवा सहमती म्हणजेच तथ्य होय." प्राथमिक तथ्य आणि द्वितीय तथ्य असे तथ्य संकलनाची प्रमुख दोन तंत्रे आहेत ते याप्रमाणे :

अ) प्राथमिक स्त्रोत :

तथ्य संकलनाचा प्राथमिक स्त्रोत हा प्रथम आहे. यामध्ये संशोधक स्वत: अध्ययन क्षेत्रात जाऊन अभ्यास विषयाच्या संबंधित जीवत व्यक्तीकडून मुलाखत, अनुसूचीच्या साहाय्याने किंवा निरीक्षणाद्वारे माहिती संकलित करतो, त्यास प्राथमिक तथ्य संकलन असे म्हणतात.

**ब)	दुय्यम स्त्रोत :**

समाजशास्त्रीय संशोधनात तथ्य संकलनाचा महत्त्वपूर्ण मार्ग द्वितीय स्त्रोत आहे. यामध्ये प्रकाशित आणि अप्रकाशित अशा लिखित माहितीचा समावेश होतो. संशोधन क्षेत्रात प्रत्यक्ष जाऊन माहिती संकलित करावी लागत नाही तर विषयाशी संबंधित माहिती, संदर्भग्रंथ, ग्रंथालय, सांख्यिकीय माहिती, हस्तलिखित पत्रे, विविध मासिके, पीएच.डी.चे अप्रकाशित प्रबंध, समाजशास्त्र संशोधन पत्रिका, वर्तमानपत्रे आणि इंटरनेट इत्यादी साधनांचा अवलंब करून माहिती संकलित केली जाते.

महिला सक्षमीकरणाचे तथ्य विश्लेषण आणि निर्वचन :

“ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणात शिक्षणाची भूमिका” सदरील विषयाचा अभ्यास करताना तथ्य संकलित केली जाणार आहेत. संकलित केलेली माहिती अस्ताव्यस्त असते. त्या माहितीचे पद्धतशीरपणे मांडणी करावी लागते. त्याशिवाय तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन करता येणार नाही. तथ्यांचे संपादन करणे, सांकेतिकीकरण करणे, तथ्यांचे वर्गीकरण करणे आणि सारणीयन करणे हे संकलित तथ्यांवर प्रक्रिया करण्याचे प्रमुख टप्पे आहेत. प्रश्नावली या तंत्राद्वारे संकलित केलेल्या माहितीचे संख्यात्मक व गुणात्मक विश्लेषण करण्यात येणार आहे.

प्रकरणांची रूपरेषा :

प्रकरण पहिले	:	प्रस्तावना
प्रकरण दुसरे	:	संदर्भ साहित्याचा आढावा व संशोधन पद्धती
प्रकरण तिसरे	:	नांदेड जिल्ह्याची वैशिष्ट्ये आणि महिला सक्षमीकरण
प्रकरण चौथे	:	महिला सक्षमीकरणाचे तथ्य विश्लेषण व निर्वचन
प्रकरण पाचवे	:	सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भसूची :-

1. तडकलकर नंदिनी (2008), “महिलांचे सबलीकरण आणि शेतकरी महिला आघाडीचे योगदान”, नांदेड, अल्फा पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती.
2. साळुंखे आ. ह. (2011), “हिंदु संस्कृती आणि स्त्री”, मुंबई, लोकवाङ्मयगृह, नववी आवृत्ती.
3. पवार दिपक (2013), “महिलांचे राजकीय सक्षमीकरण”, नागपूर, साईनाथ प्रकाशन, प्रथम आवृत्ती.
4. जावडेकर शरद व अन्य (2008) (संपा.), “उच्च शिक्षणाची वाटचाल आणि आव्हाने, सामाजिक परिवर्तन : चिकित्सा आणि भवितव्य”, पुणे, सुगावा प्रकाशन, प्रथम आवृत्ती.
5. पानसे सुधीर (2011), “जागतिकीकरण आणि शिक्षण क्षेत्र”, मुंबई, लोकवाङ्मयगृह, प्रथम आवृत्ती.
6. बोधनकर सुधीर, अलोणी विवेक, कुलकर्णी मृणाल (2018), “सामाजिक संशोधन पद्धती”, नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन, दुसरी आवृत्ती.
7. “शिक्षण आणि समाज”, मार्च 2015, विशेषांक, समाजशास्त्र संशोधन पत्रिका
8. योजना, विकास समर्पित मासिक, ऑक्टोबर 2006,

9. पाटील एस.पी. (संपा.) (2016), “मानव हक्कांच्या माध्यमातून महिला सबलीकरणातील आव्हाने : एक जागृती मोहिम”, धुळे, अथर्व पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती.

10. आपटे ज.श., पुष्पा रोडे, (2007), “भारतातील महिला विकासाची वाटचाल”, पुणे, सुगावा प्रकाशन, प्रथम आवृत्ती.

11. वाघमारे जनार्दन (2005), “शिक्षण आणि समाज परिवर्तन”, मुंबई, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, प्रथम आवृत्ती

संशोधिका
मुळे स्वरुपा मल्लिकार्जून
एम.ए., एम.एड्.

मार्गदर्शक
प्राचार्य डॉ. मनोहर तोटरे
शाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालय, मुखेड,
जि. नांदेड